लोकमत पान क्र.7 दि. 21/05/2023

# पंतप्रधान कार्यालयात असल्याचे सांगून गंडा

## नवघर पोलिसांनी एकाला केले गजाआड

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : आपण दिल्ली येथील पंतप्रधान कार्यालयात असून, लोकांना विविध सरकारी नोकऱ्या आणि टेंडर मिळवून देण्यासाठी लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या अमितकुमार डे याला भाईंदरच्या उत्तन पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्यावर नवघर पोलिसांनी गुन्हादेखील दाखल केला आहे.

सुनील शांताराम मेढेकर (वय ५१) यांची शेजारी राहणारे राजेंद्र नायर यांच्या माध्यमातून कोरोनाकाळात अमितकुमार डे (रा. पेणकरपाडा, मीरा रोड) याच्याशी ओळख झाली होती. आपण दिल्ली येथील पंतप्रधान कार्यालयात असल्याचे सांगून रेल्वेत पॅन इंडिया मेडिसिन डिस्ट्रिब्युशनचे काम मिळवून देतो, असे डे यांनी सांगितले. त्यासाठी त्याने आवश्यक कागदपत्रे पाहिजेत म्हणून पैसे उकळले, तसेच रेल्वेचे हेल्थ डीजी बिष्णुप्रसाद शर्मा यांना दिल्ली येथे भेटायचे म्हणून बोलावले. दिल्ली येथे मेढेकर गेल्यावर त्यांच्यासाठी दारूची बाटली, आयफोन आदी खरेदी करायला लावले. रेल्वे क्वार्टरमध्ये नंदा यांची भेट घडवून दिली. विविध कारणांनी एकूण १२ लाख ८० हजार डे याने उकळले; परंतु रेल्वेत कोणतेच काम न मिळाल्याने मेढेकर यांनी पैसे परत मागण्यास सुरुवात केली असता त्यांना थोडेथोडे करून ७ लाख ५५ हजार परत केले. मात्र, उर्वरित ५ लाख २४ हजार परत न केल्याने १९ मे रोजी नवघर पोलिस ठाण्यात मेढेकर यांच्या फिर्यादीवरून डे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नोकरीचे बनावट नियुक्तिपत्रही दिले




उत्तन भागात पीएमओ कार्यालयात आहे, असे सांगून सरकारी नोकरी लावण्याचे प्रलोभन दिले. फसवणुकीची रक्कम ५३ लाखांपर्यंत आहे. डे याने बनावट सरकारी नियुक्तिपत्रही दिले. डे याला उत्तन पोलिसांनी अटक केली असून, त्याच्यावर गुजरात, औरंगाबाद आदी ठिकाणीही फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

पुढारी पान क्र.4

# रिक्षाचालकांना गुंगीकारक औषधे देऊन लुटणाऱ्या तिघांना अटक

## मुंबई, ठाण्यातील अनेक गुन्ह्यांची उकल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर परिसरात रिक्षामध्ये प्रवाशी म्हणून प्रवास करून रिक्षा चालकाला गुंगीकारक औषधे देऊन त्यांच्या अंगारील दागिने लुटणाऱ्या तिघांना गुजरातमधून गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांनी अटक केली आहे. या आरोपींनी अशाच प्रकारे फ्रुटी व पेढ्यामधून गुंगीकारक औषध देऊन काशिमीरा, खडकपाडा कल्याण, बांद्रा, आंबोली, मुंबई या ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केल्याचे तपासादरम्यान माहिती मिळाली. त्यांच्याकडून या गुन्ह्यात जबरीने व फसवणूक करून नेलेला ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या आरोपींनी विविध पोलीस ठाणे हद्दीत केलेले आठ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

बोरीवली ते मीरा रोड येथून रिक्षाचालक हा प्रवासी घेऊन बाप्पा सीताराम मंदिरासमोर, शांतीनगर, मीरा रोड पूर्व येथे येत असताना त्या प्रवाशांनी आपापसात संगनमत करून प्रवास करीत असताना त्या रिक्षाचालकाला फ्रुटीमध्ये कोणतेतरी गुंगीकारक औषध मिक्स करुन पिण्यास दिले. त्यानंतर तो रिक्षा चालक बेशुध्द झाल्यावर त्याच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची ५ हजारांची सोन्याची चैन काढून त्याची फसवणूक केल्याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा, कक्ष काशिमीरा यांनी नमुद गुन्हयाचा समांतर तपास करून गुन्हे करणारे आरोपी सागर महेंद्रभाई पारेख (रा. सुरत, गुजरात), संपतराज ऊर्फ संपो गेवरचंद जैन, सुभाष अरविंद पाटील(रा. गुजरात) यांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. ही कारवाई काशिमीराचे पोनि अविराज कुराडे, सपोनि पुष्पराज सुर्वे, राजू तांबे व अन्य पथकाने केली.

CamScanner

पुढारी पान क्र.5

दि. 21/05/2023

# आयुक्तांच्या हस्ते आरआरआर केंद्रांचे उद्घाटन

## स्वच्छ शहर अभियानांतर्गत सहा ठिकाणी केंद्रे सुरू

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने प्लास्टिकसह जुन्या, टाकाऊ तसेच निरुपयोगी वस्तू संकलित करून त्याचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रियेसाठी शहरात सहा ठिकाणी रिड्यूस, रियुज व रिसायकल (आरआरआर) केंद्रे शनिवारी सुरु केली. त्याचे उदघाटन आयुक्त दिलीप ढोले यांच्या हस्ते करण्यात आले.



पालिकेने केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालयाच्या मेरी लाइफ मेरा स्वच्छ शहर अभियान ही योजना अंमलात आणली आहे. शहर स्वच्छ राखण्याच्या अनुषंगाने या उपक्रमाची लोकांमध्ये जनजागृती करण्यासह भविष्यात प्लास्टिकचा वापर कमी करण्यात पालिकेला यश मिळेल, अशी अपेक्षा आयुक्तांनी यावेळी व्यक्त केली. पालिकेने शनिवारी सुरु केलेल्या आरआरआर केंद्रांमध्ये शहरातील लोकं त्यांच्याकडील वापरलेली जुनी पुस्तके, प्लास्टिक, कपडे, पादत्राणे, जुनी भांडी, खेळणी, इलेक्ट्रॉनिक वस्तू व इतर निरुपयोगी वस्तू पुनर्प्रक्रियेसाठी वा पुनर्वापरासाठी जमा करू शकत असल्याचे सांगण्यात आले. या केंद्रांमध्ये जमा करण्यात येणाऱ्या निरुपयोगी वस्तूंचा पालिकेकडून पुनर्वापर केला जाणार असून पुनर्प्रक्रिया करण्यायोग्य असलेल्या वस्तूंवरच प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे पालिकेकडून स्पष्ट करण्यात आले. यासाठी उत्तन येथील चौक परिसरात असलेल्या भूत बंगला, मॅक्सस मॉल, नवघर नाका, हैदरी चौक, आयुक्त निवासलगत व काशिमीरा उड्डाणपूलखालील प्रवेशद्वाराजवळ अशी एकूण सहा केंद्रे सुरु करण्यात आली.

### प्रत्येक केंद्रावर १० स्वयंसेवक

या केंद्रांत शहरातील सामाजिक संस्था, इंटर्नचे विद्यार्थी, शहरातील जागरूक नागरीकांना सहभागी करून घेतले जाणार आहे. तसेच प्रत्येक केंद्रावर १० स्वयंसेवक निश्चित करण्यात आले असून शहरातील जास्तीत जास्त लोकांनी आपल्या घरातील, परिसरातील निरुपयोगी वस्तू गोळा करून या केंद्रांत जमा करण्याचे आवाहन आयुक्तांकडून करण्यात आले आहे. केंद्राच्या उदघाटनावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त रवि पवार, कल्पिता पिंपळे यांच्यासह पालिकेतील इतर अधिकारी, कर्मचारी, माजी नगरसेवक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पालघर जिल्हा सचिवपदी जॉन मॅथ्यू पीटर

**नालासोपारा :** वसई विरार सह पालघर जिल्ह्यात मनसेचा झंझावात बहरू लागला असून हिंदू जननायक मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने पालघर ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत 'पालघर जिल्हा सचिव या पदावर जॉन मॅथ्यू पीटरयांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेले लोकसेवेचे काम आपण प्रामाणिकपणे करून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपल्या कार्यक्षेत्रात चांगल्या रीतीने घराघरापर्यंत पोहोचवाल तसेच पक्षनिष्ठा आणि समाजकार्य याचा कधीही विसर न पडता आपण उत्तम काम करावे, यासाठी जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी पीटर यांना शुभेच्छा देवून अभिनंदन केल.

सामना पान क्र.5

# नायगावमध्ये आगडोंब

**वसई :** नायगाव पूर्व रेल्वे स्थानकालगत असलेल्या खाद्यपदार्थाच्या दुकानात शुक्रवारी मध्यरात्री सिलिंडरचा स्फोट झाला. या आगीत चार टपऱ्या जळून खाक झाल्या. या आगीमुळे त्या ठिकाणी असलेल्या सिलिंडरचा स्फोट झाला. याची माहिती मिळताच पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी जाऊन आगीवर नियंत्रण मिळविले. प्रत्यक्ष जागेवर अग्निशमन दलाचे वाहन पोहोचत नसल्याने त्या ठिकाणी यंत्रसामग्री नेऊन आग आटोक्यात आणली.


CamScanner

पुण्यनगरी पान क्र. १ — दि. 21/05/2023

# राज्यात कुणाला दंगली हव्या आहेत का?

## त्र्यंबकेश्वरप्रकरणी राज ठाकरेंची सरकारवर टीका

**नाशिक** : शंभर वर्षे जुनी परंपरा मोडित काढू नये. त्र्यंबकेश्वरमधील प्रथा थांबवणे योग्य नाही. बाहेरच्यांनी यात पडायचे काहीच कारण नाही. गावातील लोकांनीच त्यावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. ज्या गोष्टी चुकीच्या घडतात त्यावर प्रहार करणे गरजेचे आहे. मात्र, जाणूनबुजून काहीतरी खोदून



काढायचे याला अर्थ नाही. या माध्यमातून ▶▶ पान ९ वर....

### नोटबंदीचा निर्णय न परवडणारा!

दोन हजार रुपयांच्या नोटांवर बंदी घालण्याच्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्णयावरही राज ठाकरे यांनी टीका केली. ते म्हणाले की, यापूर्वी नोटाबंदी झाली, त्याचवेळी मी बोललो होतो. हा धरसोडपणा आहे. तज्ज्ञांना विचारून नोटाबंदी झाली असती, तर ही वेळ आली नसती. तेव्हा नोटा आल्या त्या एटीएममध्ये जात नव्हत्या. नोट एटीएममध्ये जाईल की नाही, याचा विचारही तेव्हा केला नव्हता. असले निर्णय देशाला परवडणारे नसतात. उद्या बँकेत पैसे टाकायचे. नंतर नवीन नोट आणणार, अशा पद्धतीने सरकार चालते का, असा सवाल राज यांनी उपस्थित केला.

### नाशिकमध्ये मनसे दिसेल!

पक्षाची बांधणी करण्यासाठी आलो आहे. पक्षातील हेवेदावे दूर केले जातील. मी मुंबईला गेल्यावरही पक्ष दिसेल, असा विश्वास राज ठाकरे यांनी व्यक्त केला. निवडणुकीत केलेली कामे लोकांपर्यंत पोहोचली तरी खूप झाले. नवीन मुद्दे येतील. आमच्या काळात जेवढी कामे झाली, तेवढी त्या आधी आणि नंतरही झाली नाहीत. ज्यांनी शहरे दत्तक घेतली त्याचे काय झाले? त्यांना कोणी प्रश्न विचारत नाहीत, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला.

# राज्यात कुणाला दंगली हव्या आहेत का?

**(पान १ वरून)** कुणाला दंगली हव्या आहेत का, असा सवाल करत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर निशाणा साधला. आतापर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास पाहिला, तर मराठी मुसलमान राहतात, तिथे दंगली होत नाहीत. राज्यात काही ठिकाणी सामंजस्य आहे. काही लोकांनी ते बिघडवू नये, असा सूचक इशारादेखील ठाकरे यांनी दिला.

महापालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे नाशिकच्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहेत. शनिवारी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना त्र्यंबकेश्वर मंदिर प्रकरणावरून राजकारण्यांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, त्र्यंबकेश्वरची प्रथा जुनी आहे. परंपरेनुसार त्यांनी धूप दाखवण्याचा प्रयत्न केला. मग एवढा गदारोळ कसा झाला, आपला धर्म एवढा कमकुवत आहे का की कोणी आल्याने तो भ्रष्ट होईल? महाराष्ट्रात अनेक मशिदी आणि मंदिरे आहेत. तिथे हिंदू-मुस्लिम एकत्र दिसतात. माहिमच्या दर्ग्यात माहिम पोलीस ठाण्याचा कॉन्स्टेबल चादर चढवतो. माझ्याकडे अशी आणखी उदाहरणे आहेत. ही परंपरा सुरू ठेवली पाहिजे. ज्या भागात मराठी मुसलमान राहतात, त्या भागात कधीही दंगली होत नाहीत, हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. जिथे गोष्टी चुकीच्या घडतील, तिकडे प्रहार करणे गरजेचे आहे. जसे मागील वेळी लाऊडस्पीकर आणि समुद्रातील दर्ग्याविषयीचा मुद्दा मांडला होता. मशिदींवरील भोंग्यांविषयी बोलले पाहिजे, जे दिसते त्यावर बोलले पाहिजे. गड-किल्ल्यांवरील अनधिकृत दर्गे हटवलेच पाहिजेत, असे ठाकरे यांनी सांगितले. या सर्व गोष्टींना सोशल मीडिया कारणीभूत असून, त्यावर या गोष्टी पाहिल्या जातात. त्यातून गैरसमज पसरवले जातात, असे नमूद करत महाराष्ट्र पोलिसांना ४८ तास द्या, दंगलीच्या घटना घडणार नाहीत, असे सूचक विधानही राज ठाकरे यांनी यावेळी केले.

### जैतापूरला प्रकल्प न्या!

बारसू रिफायनरीवरही राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. जमिनीतील व्यवहारातून होणाऱ्या या गोष्टी आहेत. हजार-दोन हजार एकर जमीन पटकन मिळते, ही काय गंमत आहे का, याचा अर्थ कोणी तरी जमिनी घेतल्या आहेत. शेतकऱ्यांकडून कमी भावात जमिनी विकत घ्यायच्या अन् सरकारला जास्त भावात विकायच्या, हे धंदे सुरू आहेत, असे नमूद करत जैतापूरची कंपनी बुडाली. आता काय करणार, रिफायनरीचा प्रकल्प जैतापूरला का नेत नाही, असा सवाल त्यांनी राज्य सरकारला विचारला.

CamScanner

दि. 21/05/2023

पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरमधील बाधितांना मिळणार हक्काची घरे

## ▮ बिल्डरने बांधलेली २३० सदनिकांची इमारत पालिकेकडे हस्तांतरित

▮ **मीरा रोड** : मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील 'परवडणाऱ्या घरांची योजना' (अफोर्डेबल हौसिंग स्कीम) अंतर्गत बिल्डरने बांधलेली २३० सदनिकांची इमारत महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे शहराचा विकास करताना बाधित झालेल्या नागरिकांना यातून हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मीरा, महाजनवाडी येथे राज्य सरकारने परवडणाऱ्या घरांची योजना (अफोर्डेबल हौसिंग स्कीम) मंजूर केली होती. त्यात बिल्डरला जादा एफएसआय मिळतो. त्याने मिळालेल्या परवानगीनुसार बांधकाम पूर्ण करून त्याच्या हिश्श्याची घरे विकायची व अफोर्डेबल हौसिंग युनिट अंतर्गत सदनिका बांधून महापालिकेला हस्तांतरण करायच्या अशी ही योजना आहे. शहरात शासनाच्या परवडणाऱ्या घरांची योजनेंतर्गत जी घरे बांधून पूर्ण झाली आहेत. ती घरे महापालिकेने ताब्यात घ्यावीत तसेच विविध इमारतींचे भूखंड ताब्यात घेऊन त्याचा विकास करणे आवश्यक आहे. परंतु या योजनेतील महापालिकेच्या हक्काची घरे बिल्डरकडून महापालिकेकडे हस्तांतरित केली जात नव्हती. जोपर्यंत महापालिकेच्या हक्काची घरे हस्तांतरित होत नाहीत. तोपर्यंत बिल्डरला ओसी दिली जाणार नाही, असे महापालिकेने सांगितले होते. त्यामुळे अखेर महाजनवाडी येथील २३० घरे बिल्डरने महापालिकेला हस्तांतरित केली आहेत. या बिल्डरला मिळालेल्या एफएसआयनुसार बिल्डरने २ इमारती बांधून विकल्या आहेत. १ बिल्डिंग (२३० सदनिका) महापालिकेला बांधून हस्तांतरित केली आहे. 'लॉक अँड की' पॉश घरे तयार करून महापालिकेला दिली आहेत. त्यामुळे रस्ता रुंदीकरण अथवा इतर विकासकामे करत असताना नागरिक बाधित होतात. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी नागरिकांना हक्काची मालकी घरे यामुळे देता येणार आहेत.



# मासेमारीसाठी गेलेल्या खलाशाचा हृदयविकाराने मृत्यू



▮ **नालासोपारा** : अर्नाळा येथील 'निसर्ग' बोट गुरुवारी सायंकाळी समुद्रात मासेमारीसाठी गेली असता बोटीवरील खलाशी विजय तारे यांचा मध्यरात्री हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

तारे यांच्या छातीत दुखू लागल्याने तातडीने कोस्टगार्डशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र खराब हवामानामुळे संपर्क होऊ शकला नाही. तारे यांची प्रकृती चिंताजनक झाल्याने त्यांनी कोस्टगार्डशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो प्रयत्नही फोल गेला. अखेर पहाटेच्या दरम्यान निसर्ग बोटीचा अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याच्या गस्ती नौकेला संदेश मिळाल्यानंतर अर्नाळा गस्ती नौकेने खोल समुद्रात जाऊन निसर्ग बोटीवर असलेल्या खलाशाला समुद्रकिनारी आणून रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तारे यांना मृत घोषित केले.

CamScanner

म.टा. फ्रंट पेज 2

दि. 21/05/2023

# एफटीआयआयमध्ये गोंधळ

## 'द केरला स्टोरी'चा विशेष खेळ वादात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'द केरला स्टोरी' या चित्रपटाच्या खास शोवरून फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्युटमध्ये (एफटीआयआय) शनिवारी गोंधळ झाला. विद्यार्थ्यांनी चित्रपटाच्या विरोधात घोषणाबाजी केल्यानंतर कलाकार आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी 'भारतमाता की जय', 'जय श्रीराम' यासह लव्ह जिहाद मुर्दाबादच्या घोषणा दिल्याने चित्रपट शिक्षण संस्थेचे रूपांतर राजकीय आणि धार्मिक आखाड्यात झाले होते. यामुळे शंभर पोलिसांचा फौजफाटा तेथे तैनात करण्यात आला होता.

मिती फिल्म सोसायटीतर्फे फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्युटमध्ये (एफटीआयआय) 'द केरला स्टोरी' या चित्रपटाचा विशेष खेळ शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता आयोजित करण्यात आला होता. डाव्या विचारसरणीचा प्रभाव असलेल्या विद्यार्थ्यांच्या संस्थेत हा चित्रपट दाखवला जाणार असल्याने सकाळी ९ वाजल्यापासून कलाकार, प्रेक्षक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. एफटीआयआयचे चित्रपटगृह राजकीय व धार्मिक अजेंड्यासाठी वापरले जात असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी प्रपोगंडा चित्रपट म्हणून यास विरोध केला. चित्रपटाविरोधात त्यांनी फलक दाखविले. चित्रपटाचे प्रक्षेपण सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांकडून चित्रपट बंद करण्याबाबत जोरजोरात घोषणाबाजी करण्यात येत होती. त्याला उत्तर म्हणून हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी 'भारतमाता की जय', 'जय श्रीराम' लव्ह जिहाद मुर्दाबादच्या घोषणा दिल्याने वातावरण तंग झाले होते. चित्रपटाच्या समर्थकांची घोषणाबाजी आणि एफटीआयआयचे चित्रपटगृह राजकीय व धार्मिक अजेंड्यासाठी वापरण्याच्या कारणावरून विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे वादाचा खेळ रंगला होता.



### दुपारपर्यंत तणाव

दहशतवादाला कोणताही धर्म नसतो, असे आम्हाला दीर्घकाळापासून शिकवण्यात आले आहे; परंतु आम्ही चित्रपटातून दहशतवादाच्या यंत्रणेचे चित्रण केले तेव्हा काही घटकांनी त्याचा संबंध धर्माशी जोडला. हे खेदजनक आहे, अशी खंत चित्रपटाचे निर्माते विपुल शहा आणि दिग्दर्शक सुदीप्तो सेन यांनी चित्रपटानंतरच्या संवादात व्यक्त केली. गोंधळाची शक्यता लक्षात घेऊन या जोडगोळीने एफटीआयआयमधून काढता पाय घेतला. त्यानंतर पुन्हा विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी केल्याने दुपारपर्यंत गोंधळाचे वातावरण होते.

सकाळ पान क्र. 5

**अवयवदान चळवळ** नऊ जणांचे जीवन फुलणार ; बेंगळूर येथील रस्ते अपघातात मृत्यू

# विरारच्या तरुणाचे मृत्युपश्चात अवयवदान

विरार, ता. २० (बातमीदार) : 'मरावे परी कीर्तिरूपी उरावे' या उक्तीनुसार विरार येथील तरुणाचे मृत्युपश्चात अवयवदान करण्यात आले. विरार येथील तरुणाचा बेंगळूर येथे दुचाकी अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर त्याची पत्नी व आई-वडील यांनी त्याच्या मृत्यूपश्चात अवयवदान करण्याचा निर्णय घेतला. साकेत दंडवते (वय ३०) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याच्या अवयवदानामुळे हृदय, यकृत, मूत्रपिंड, कॉर्निया, डोळे यामुळे नऊ जणांना जीवनाची नवीन उमेद मिळून नवसंजीवनी मिळणार आहे.



साकेत दंडवते

विरारमधील प्रसिद्ध डॉ. विनित दंडवते व डॉ. सुमेधा दंडवते यांचा साकेत हा मोठा मुलगा असून बेंगळूर येथील ओके क्रेडिट कंपनीत तो कामाला होता.

पुण्यावरून १५ मे रोजी बेंगळूर येथे दुचाकीवरून जात असताना महामार्गावर चित्रदुर्ग येथे त्याच्या दुचाकीला अपघात झाला होता. त्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर त्याला तेथील बसवराज आप्पा मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र मेंदूला जबर दुखापत झाल्याने त्याला बेंगळूर येथील नारायण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्याचा शुक्रवारी (ता. १९) मृत्यू झाला.

### नववधूचा धाडसी निर्णय

पाच महिन्यांपूर्वीच साकेतचा विवाह झाला होता. कुटुंबावर कोसळलेल्या या दुःखद प्रसंगाला धैर्याने सामोरे जात त्याची पत्नी अपर्णा हिने सासरे डॉ. विनित व सासू डॉ. सुमेधा यांना सावरत दुःख पचवत साकेतच्या अवयवांचे गरजूंना दान करण्याचा मोठा निर्णय घेतला. आता त्याच्या अवयवदानातून तीन जणांना यकृत, दोन जणांना मूत्रपिंड, दोन जणांना डोळे; तर दोन मुलांना हृदयाच्या झडपा व त्वचा मिळून जीवनाची नवीन उमेद मिळणार आहे. आपल्या मृत्यूपश्चात माझ्या मृत शरीराचे अवयवदान करण्यात यावे, अशी इच्छा यापूर्वीच साकेतने व्यक्त केली होती.

CamScanner

लोकमत

# तीन महिलांवर कारवाई

नालासोपारा : सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव केल्याप्रकरणी वसईत तीन महिलांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वसई रोड पश्चिम बस डेपो येथे मनपा कार्यालयाच्या बाजूला शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास तीन महिला शरीरविक्री करण्यासाठी अश्लील हावभाव, अंगविक्षेप व हातवारे करून गिऱ्हाइकांना आकर्षित करीत असताना माणिकपूर पोलिस ठाण्याच्या महिला पोलिसांना आढळून आल्या होत्या. याबाबत तीन महिलांविरोधात माणिकपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

Hello Vasai
Page No. 1 May 21, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

मुंबई चौफेर

# मंदिरातील घंटा चोरणाऱ्यांना अटक

भाईंदर - नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मीरा रोड पूर्व परिसरात शंकेश्वर जैन पार्श्वनाथ मंदिरातील दोन पितळी घंटा चोरी करणाऱ्या चोरट्यांना गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१ ने अटक केली आहे. त्यांच्यावर नयानगर पोलीस ठाण्यात कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नयानगर पोलीस ठाण्यात घंटा चोरी झाल्याचा गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांच्यामार्फत करण्यात येत होता. तपासात सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराच्या मार्फत मिळालेल्या माहितीवरून सदरचा गुन्हा करणाऱ्या आरोपी आवेश अहमद खान याचा शोध घेत त्याला विचारपूस केली असता, त्याने त्याचा आणखी एक साथीदार याच्यासोबत घंटा मध्यरात्री ०१.३०च्या सुमारास चोरी केल्याची माहिती दिली. सदरची चोरी केलेली घंटा भंगारवाल्याला विक्री केल्याचे सांगितले. आरोपींना ताब्यात घेत पुढील कारवाई नयानगर पोलीस करत आहेत.

---

Mumbai Choufer
21 May 2023 -Page 3

CamScanner

मुंबई चौफेर

# प्रवासी बनून लुटणारे अटकेत

भाईंदर - रिक्षात प्रवासी बनून प्रवास करण्याच्या बहाण्याने रिक्षाचालकाची फसवणूक करत त्यांना लुटणाऱ्या तिघा जणांना गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१ शाखेने अटक केले आहे. त्यांच्याकडून ५,९०,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. काशिमीरा पोलीस ठाण्यात ३ जणांची लूट केल्याची तक्रार निरनिराळ्या कलमांनुसार दाखल करण्यात आली आहे. आरोपींवर याअगोदर देखील ५ ठिकाणी फसवणूक करत लुटण्याचे गुन्हे दाखल आहेत.

आरोपी प्रवासी बनून लुटण्यासाठी गुजरात वरून येत होते. बोरिवलीवरून रिक्षाने मीरा-भाईंदर शहरातील मंदिरात जाऊन परत येण्याच्या नावाखाली जास्त भाडे मिळण्याच्या नावाखाली रिक्षा चालकाची फसवणूक करण्यात येत होती. प्रवासादरम्यान रिक्षाचालकाला मंदिरातला प्रसाद देण्याच्या बहाण्याने गुंगीचे औषध मिसळलेला पेढा चारला जात होता. पेढा खाल्ल्यावर गुंगी आल्यावर रिक्षा चालकाच्या शरीरावरील सोन्याची चैन, अंगठी, फोन, रोख रक्कम घेऊन चोर पळ काढत असल्याचा प्रकार घडत होता. प्रवासी बनून लुटण्याची घटना घडल्यानंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यावर गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१ ने पेढा चारत लूटमार करणाऱ्या ३ जणांना ताब्यात घेतले आहे.

Mumbai Choufer
21 May 2023 -Page 5

CamScanner

लोकमत

# वसईच्या ९ वर्षीय स्वराने केले 'सरपास' शिखर सर

## उणे १४-१६ अंश तापमानात ५ मोहिमा पूर्ण



वसईकर स्वरा पाटील या ९ वर्षीय मुलीने १३,८५० फुटापेक्षा उंचीवरील सरपास शिखर सर करून यशस्वी कामगिरी केली आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वयवर्षे अवघे ९ असलेल्या वसईकर स्वरा पाटील हिने १३ हजार ८५० फुटापेक्षा उंचीवरील सरपास शिखर सर करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. स्वराने १२ मे रोजी तिच्या प्रवासाला सुरुवात केली होती. १७ मेपर्यंत अर्थात ६ दिवसात तिने ५ गिर्यारोहण मोहिमा पूर्ण केल्या. त्यातही शेवटचे ३ दिवस तर उणे १४ ते १६ अंश तापमान असूनही तिने ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

१२ मे या पहिल्या दिवशी कसोल बेस कॅम्प ५ हजार ३०० फुट, १३ मे कसोल बेस कॅम्प ते ग्रहान ७ हजार ८०० फुट, ग्रहन ते मीनताच ११ हजार १०० फुट, मीनताच ते नगारू १२ हजार ४५०, नगारू ते बिसकरी व्हाया सारपास १३ हजार ८५० फुट, बिसकरी ते बारशायनी ७ हजार २०० फुट अशी ५ हिमालयीन गिर्यारोहण मोहीम तिने १२ ते १७ मे या कालावधीत पूर्ण केली. कपड्यांचे चार थर धारण करत ६ दिवसांत संपूर्ण अंतर पार केले. कैलासरथ या गिर्यारोहण संस्थेमार्फत या मोहिमेचे आयोजन केले होते.

### कळसूबाई मोहीम पूर्ण

वसईच्या उमेळमान गावात राहणारी स्वरा ही कार्मेलाईट कॉन्व्हेंट हायस्कूल या शाळेतील विद्यार्थिनी असून नुकतेच तिने महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखरावर यशस्वी गिर्यारोहण मोहीम पूर्ण केली होती. कमी वयात इतकी मोठी गिर्यारोहण मोहीम करणाऱ्या स्वराचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



CamScanner